# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा सचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि.वि./४७५ दि. २५.०९.२०१८.

प्रति,

प्राचार्य
सर्व संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

विषय :– दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये सोईसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :– १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३०२, दि. २७ ऑगष्ट, २०१८.
२) शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/दिविसो/२०१८/वि.शि.१/९९६४,दि.०४.०९.२०१८.

महोदय,

आपणांस आदेशानुसार कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २७ ऑगष्ट, २०१८ चे अनुषंगाने केंद्र शासनाच्या **The Rights of Persons with Disabilities Act, 2016** च्या तरतुदीनुसार महाविद्यालयात प्रवशित दिव्यांग विद्यार्थ्यांना विना अडथळा परिचालन होण्यासाठी खालीलप्रमाणे सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्देशित केले आहे.

१) महाविद्यालयामध्ये आरक्षण, सुलभता व अध्यापन संबंधीचे शास्त्र.
२) कलम– ४० नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये सहजरित्या परिचालन करण्यासाठी रॅम्प, कॉमन रुम, क्लास रुम, कॅन्टीन, स्टाफ रुम, लेडीज कॉमन रुम व वॉशरुम, माहिती तंत्रज्ञानावर आधारीत संपर्क साधने व त्यांच्या निगडीत सोईसुविधा व इतर सेवा पुरविणे.
३) कलम– ४४ नुसार कोणत्याही उच्च शिक्षण संस्थांमध्ये केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे बांधकाम करणे., त्या महाविद्यालयामध्ये वर निर्देशित केलेल्या सोईसुविधा उपलब्ध करणे.

वरिलप्रमाणे सोईसुविधा दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध केल्याबाबतचा अहवाल मा.उच्च न्यायालयास शासनाला तातडीने सादर करावयाचा असल्याने आपणांस विनंती करण्यात येते की, दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊन त्याचा कार्यपालन अहवाल विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभाग येथे दिनांक ०३.१०.२०१८ पर्यंत सादर करण्यात यावा. जणेकरुन शासनास माहिती सादर करणे सोईचे होईल. जी महाविद्यालये उपरोक्त मुदतीत कार्यपालन अहवाल सादर करणार नाहीत व त्यामुळे शासनास मा.उच्च न्यायालयाला कार्यपालन अहवाल सादर करण्यास अडचणी आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू

(डॉ.रमण मदने)
उपकुलसचिव
(अति.कार्यभार)

C:\Documents\AFFLIATION\LETTERS FILE.doc,

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना केंद्र शासनाच्या "The Rights of Persons with Disabilities Act, २०१६" च्या तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २७ ऑगस्ट, २०१८

**वाचा :-**

१) The Rights of Persons with Disabilities Act, २०१६.
२) शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४, दि.२५ जून, २०१८.
३) शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-१०१८/प्र.क्र.२०४/मशि-२, दि.२३ ऑगस्ट, २०१८.

**प्रस्तावना :-**

राज्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन , अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यामापना बरोबरच इतर सोई सवलती सुध्दा मिळणे क्रमप्राप्त आहे. या संदर्भात केंद्रशासनाने The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ हा अधिनियम दि. २८ डिसेंबर, २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करुन तो सर्व शासकीय संस्थाना लागू केला आहे. सद्यस्थितीत मानव संसाधन व विकास विभागाने The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ लागू केला असून उच्च शिक्षण संस्थांना सुचना प्रस्तुत केल्या आहेत.

याच विषयाच्या अनुषंगाने Disable Rights Groups and Others विरुध्द Union of India and Others रिट पिटीशन क्र. (Civil) २९२/२००६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५ डिसेंबर, २०१७ रोजी ऐतिहासीक आदेश दिले असून The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ नुसार उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठामध्ये आरक्षण, सुलभता व अध्यापन संबंधीचे शास्त्र इत्यांदी बाबत अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत.

केंद्रशासनाने The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ हा अधिनियम दि. २८ डिसेंबर, २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करुन तो सर्व शासकीय संस्थाना लागू केला आहे. या अधिनियमातील कलम ३२ मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

(१) All government institutions of higher education and other higher education institutions receiving aid from the Government shall reserve not less than five percent seats for persons with benchmark disabilities.

(२) The person with benchmark disabilities shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

वरिल मुद्दयांच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. २ व ३ चे शासन निर्णय निर्गमित केले असून त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे. तसेच Rights of Persons with Disabilities Act, २०१६ मधील कलम २ मधील (झेड सी) नुसार विशेषीकृत अपंगत्वाच्या २१ प्रकरणी (Specified Disabilities) परिक्षेबाबत अंपगत्वनुसार सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत दि. ४ मार्च, २०१७ अन्वये शासन निर्णय निर्गमित केला आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. १०५/२०१८ च्या सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ **मधील** कलम ४० आणि ४४ मध्ये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे पुढीलप्रमाणे आदेश दि. १८ जुलै, २०१८ रोजी दिले आहेत.

Section ४०-Accessibility-

This is with reference to laying down the standards fo accessibility for the physical environment, transportation, information and communication, including appropriate technologies and other services provided to the public in urban and rural areas.

Section - ४४ -

Mandatory observance of accessibilities norms-

a) No establishments shall granted permission to build any structure if the building does not adhere the rules formulated by Central Government under Section ४०
b) No establishment should be issued a certificate of completion or allowed to take occupation of the building unless it has adhered to the rules formulated by the Central Government.

From the record placed before us, we find that several instructions were issued from Director of Higher Education for creating necessary facilities for barrier free access to handicapped persons in the establishments like universities, colleges, classrooms, canteens, staff rooms, ladies common room and washrooms etc. A reference has been made to National Building Code which needs to be complied with.

The State and the Director of Education shall issue instructions to all the Universities to call for compliance report from the educational institutions. In case any completion certificate in respect of the structures, institutions, establishment/buildings as required by the Act are pending with the authorities then necessary compliance be sought for before issuing the occupancy or completion certificates. In case the occupancy or completion certificate of such buildings was already granted, then such authorities would take necessary steps for creating basic facilities like ramp, washrooms, barrier free access for handicapped persons in such buildings.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे वरील आदेशाच्या अनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाने दि. ०६/१२/२०१४ व दि ०१/०८/२०१८ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याच अनुषंगाने शासन स्तरावरुन सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित शासकीय व अशासकीय सर्व अनुदानित महाविद्यालये/परिसंस्थांना खालील तीन मुद्द्यांच्या संदर्भात सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Three key areas by higher education institutions and university as per the Rights of Persons with Disabilities Act २०१६ for the benefit of persons with -disability ◦studying in higher education institution-

i. **Reservation Policy**- Implementation of ५% reservation as per The Rights of Persons with Disabilities Act २०१६.

ii. **Accessibility and Barrier Free Environment**- To implement barrier free guidelines for proper access to orthopedic disabled persons so that they are able to freely move in the educational institution and access the education facilities. Access audit of University college building should be done by expert disability studies. Necessary modification shall be done in those college buildings annual basis.

iii. **Pedagogy and curriculum accessibility** - The teaching curriculum shall be accessible to the student with disability. Teachers shall make Pedagogy adaptation by making adequate provisions and facilities for teaching to students with disability in classrooms, research and laboratory, depending upon the nature of their

disability, to enable them to undertake their studies effectively. University shall provide accessible devices to students with disability to study effectively.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

१) **<u>प्रवेश सुलभता व विना अडथळा परिचालन :-</u>**

सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांनी विना अडथळा परिचालन होण्यासाठी दिव्यांगाना सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांच्या इमारतीमध्ये दिव्यांगांचा प्रवेश सुलभ आहे किंवा कसे याबाबत दिव्यांग क्षेत्रातील तज्ञाकडून लेखापरिक्षण (Audit) करुन घेण्यात यावे व त्यानुसार महाविद्यालयीन इमारतीमध्ये राष्ट्रीय इमारत संहितेनुसार वर्षभरात आवश्यकतेनुसार फेरबदल करुन घेण्यात यावेत.

२) **<u>अध्यापन शास्त्र व अभ्यासक्रमामधील सुलभता:-</u>**

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम हा दिव्यांग सुलभ असावा. दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण परिणामकारकरित्या होण्यासाठी त्यांचे व्यंगानुसार वर्गखोल्या, संशोधन व प्रयोगशाळा इत्यांदीमध्ये अध्यापन शास्त्र व इतर सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. विद्यापीठांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण परिणामकारक रित्या पूर्ण करण्यासाठी त्यांना आवश्यक असलेली सुलभ साधने उपलब्ध करुन देण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०८२७१६४५४७३३०८ आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सिध्दार्थ खरात)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठांची अध्यक्ष/कुलसचिव, महाराष्ट्र राज्य
८. सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
९. उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती - कार्यासन विशि-३.